**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)**
**जनसंपर्क विभाग**

---

# विद्यापीठातर्फे पर्यावरण पुरस्कार नामांकनाकरीता आवेदनपत्र आमंत्रित

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे दरवर्षी पर्यावरण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील सर्व महाविद्यालये, शाळा व सामाजिक भावनेतून पर्यावरण संवर्धनाचे कार्य करणारे सक्षम प्राधिकारणांकडे नोंदणीकृत विविध प्रतिष्ठान आणि स्वयंसेवी संस्था (गट अ) व व्यक्ती (गट ब) यांना पर्यावरण पुरस्कार प्रदान केल्या जातो. यावर्षी हा पुरस्कार राष्ट्रीय प्रदुषण नियंत्रण दिनानिमित्ताने दि. ०२ डिसेंबर, २०२० रोजी ससन्मान प्रदान करण्यात येईल.

सन २०२० चा पर्यावरण पुरस्कार प्राप्त करण्यास इच्छूक व्यक्ती/संस्थांसाठी सविस्तर माहिती व आवेदनपत्र विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर ‘डाऊनलोड’ या शिर्षांतर्गत ‘अवार्ड अचिव्हमेन्ट’ यामध्ये उपलब्ध आहे. तरी इच्छुकांनी दि. ३१ ऑगस्ट, २०२० किंवा त्यापूर्वी विहीत प्रपत्रातील नामांकन आवेदनपत्र विद्यापीठाकडे पाठवावे, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे. अधिक माहितीकरीता उद्यान अधीक्षक श्री अनिल घोम यांचेशी प्रत्यक्ष अथवा दूरध्वनी क्र. ९९२२९११०१ यावर संपर्क साधता येईल.

---

प्रति,
मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी,
दै. ..................... अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ३०/०७/२०२०.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी